DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 10 मार्च 2021.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 11/03/2021.

**आदेश:-**

संदर्भ क्र. 3 कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा एक भाग म्हणून उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये काही निर्बंध लागू करण्यात आले असून दर रविवारी जनता कर्फ्यू जाहीर करण्यात आलेला आहे.

तथापि दि. 14.03.2021 रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची राज्यसेवा पूर्व परीक्षा-2020 तसेच सोलापूर जनता सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया होणार असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा पूर्व परीक्षा-2020 करिता नियुक्त अधिकारी/कर्मचारी, परीक्षार्थी उमेदवार, परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सर्व व्यक्ती यांना तसेच सोलापूर जनता सहकारी बँकेच्या निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी/कर्मचारी, मतदार, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व व्यक्ती यांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यासाठी दि. 14.03.2021 रोजीच्या जनता कर्फ्यूमध्ये सूट देण्यात येत आहे. उर्वरित लोकांसाठी दि. 14.03.2021 रोजीच्या जनता कर्फ्यूबाबत संदर्भ क्र. 3 मध्ये नमूद या कार्यालयाचे दि. 10 मार्च 2021 चे आदेश कायम राहतील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुख्य कार्यालय, 5 ½, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - 400 021 यांना माहितीस्तव सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर जनता सहकारी बँक, सोलापूर.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद/नगर पालिका/नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
9. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner